# महाराष्ट्र शासन

किसनि-२०१९/प्र.क्र.२०/११अे
कृषि व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार,
मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १ जून, २०१९

प्रति,

आयुक्त (कृषि),
कृषि आयुक्तालय, पुणे

**विषय** : प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM KISAN) योजनेसंदर्भात सुचना.

**संदर्भ** : १. कृषि व पदुम विभाग परिपत्रक क्र.किसयो-२०१९/प्र.क्र.२०/११-अे दि. ०४.०२.२०१९

२. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.किसयो-२०१९/प्र.क्र.२०/भाग-४/११-अे दि. १५.०२.२०१९

महोदय,

केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेची अंमलबजावणी करण्यासंदर्भात संदर्भ क्र. १ व २ अन्वये सविस्तर सुचना दिलेल्या आहेत. योजनेअंतर्गत केंद्रशासनाच्या संकेतस्थळावर शेतकऱ्यांची माहिती भरल्यानंतर सदर माहितीची FIRST LEVEL व PFMS LEVEL वर छाननी झाल्यानंतर पात्र लाभार्थ्यांना आर्थिक लाभ देण्यापूर्वी सदर यादीची पडताळणी करण्यासाठी सदर यादी संबधीत USERS ला उपलब्ध करून दिल्यानंतर मोठ्या प्रमाणावर माहिती किरकोळ करणास्तव USER LEVEL वरून BLOCK करण्यात आलेली असल्याने अदांजे ७.५० लक्ष लाभार्थ्यांना लाभ देणे शक्य झालेले नाही. सदर पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी NIC ने संकेतस्थळावर CORRECTION WINDOW उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. याअनुषंगाने सदर पात्र शेतकऱ्यांना तात्काळ लाभ देण्यासाठी खालील प्रमाणे मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहेत :-

१. PM-KISAN संकेतस्थळावर नोंदविण्यात आलेल्या नावाचा क्रम व PFMS प्रणालीने उपलब्ध करून दिलेल्या नावातील क्रम (प्रथम नाव, मधले नाव व आडनाव) भिन्न असला तरी अशा लाभार्थ्यांस ACCEPT करण्यात यावे. (उदा. संकेतस्थळावर नोंदविण्यात आलेले नाव - Swapnil Sopan More व PFMS प्रणालीनुसार उपलब्ध नाव- More Swapnil Sopan )
२. PM-KISAN संकेतस्थळावर नोंदविण्यात आलेल्या नावातील SPELLING व PFMS प्रणालीने उपलब्ध करून दिलेल्या नावातील क्रम व SPELLING भिन्न असले तरी सदर नावाचा उच्चार समान अथवा सारखाच असल्यास अशा लाभार्थ्यांस ACCEPT करण्यात यावे. (उदा. संकेतस्थळावर नोंदविण्यात आलेले नाव - Swapnil Sopan More व PFMS प्रणालीनुसार उपलब्ध नाव- Swapneel Sopan More अथवा More Swapneel Sopan)

३. PM-KISAN संकेतस्थळावर नोंदविण्यात आलेले नाव व PFMS प्रणालीवर उपलब्ध करून दिलेले नावातील क्रम भिन्न असेल परंतू त्या नावासमोर केवळ prefix (Mr./Mrs./Smt.) असल्यास अशा लाभार्थ्यांस ACCEPT करण्यात यावे. (उदा. संकेतस्थळावर नोंदविण्यात आलेले नाव - Swapnil Sopan More व PFMS प्रणालीनुसार उपलब्ध नाव- Mr.Swapnil Sopan More अथवा Mr. More Swapneel Sopan )

४. PM-KISAN संकेतस्थळावर नोंदविण्यात आलेल्या नावातील SPELLING व PFMS प्रणालीने उपलब्ध करून दिलेल्या नावातील SPELLING भिन्न असेल व सदर नावाचा उच्चार सुद्धा भिन्न असल्यास अशा लाभार्थ्यांच्या नावाची छाननी ही बँक खाते अथवा आधार क्रमांकावरील नावाशी पडताळणी करून तदनंतर ACCEPT/REJECT बाबतचा निर्णय घेण्यात यावा.

५. PM-KISAN संकेतस्थळावर नोंदविण्यात आलेले नाव व PFMS प्रणालीने उपलब्ध करून दिलेले नाव यामध्ये पूर्णत: तफावत असल्यास अशा लाभार्थ्यांस ACCEPT/REJECT करण्यापूर्वी उपलब्ध कागदपत्रे तपासून उचित कार्यवाही करण्यात यावी.

२. उपरोक्त प्रमाणे नमुद केलेली काही उदाहरणे विचारात घेऊन आयुक्त (कृषि) यांनी BLOCK DATA CORRECTION करीता आवश्यक सूचना निर्गमित कराव्यात.

आपला,

(एकनाथ डवले)
सचिव (कृषि) , महाराष्ट्र शासन

प्रत आवश्यक तत्काळ कार्यवाही साठी अग्रेषित,

१. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व जिल्हाधिकारी
३. सर्व जिल्हाअधिक्षक कृषि अधिकारी